शनिवार, १८ ऑगस्ट २०१८

तरुण भारत

# मर्यादित हेतूमुळे शिक्षणाचा उद्देश फोल

## दोडामार्ग येथील कार्यक्रमात प्रा. पौर्णिमा केरकर यांचे प्रतिपादन



दोडामार्ग : लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात समृद्धी केरकर हिचा सत्कार करतांना विद्यार्थिनी. सोबत डॉ. व्ही. ए. पाटील, प्रा. पौर्णिमा केरकर, प्रा. राजेंद्र केरकर. लवू परब

वार्ताहर
दोडामार्ग

शिक्षणातून नोकरी मिळवायची आहे, हा मर्यादित हेतू ठेवल्याने शिक्षण घेणे निरर्थक ठरत आहे. शिक्षणातून विविध कला–कौशल्ये यांचा विकास झाला पाहिजे. मात्र, पदवीसाठी शिक्षण घेण्याची भावना वाढीस लागल्याने भावना व संवेदना बोथट बनत चालली आहे, असे प्रतिपादन गोव्यातील नामवंत कवयित्री व गोवा सरकारी मराठी अकादमीच्या सदस्या प्रा. पौर्णिमा केरकर यांनी येथे केले.

आपण अध्यापन करत असतांना काही विद्यार्थ्यांचे अवधान इतर गोष्टीकडे जात असल्याचे आढळून आले. त्याचा मी अभ्यास केला असता विद्यार्थी वेगळ्याच भावविश्वात वावरत असल्याचे दिसून आले. म्हणूनच मी माझ्या मुलीला बिनभिंतीच्या म्हणजे निसर्गशाळेत शिकविण्याचे ठरविले. आज शिक्षणाबरोबर ती कला व छंद जोपासत असून ती अत्यंत आनंदी जीवन जगत आहे, असेही त्या म्हणाल्या.

येथील दोडामार्ग हळबे महाविद्यालयात मराठी वाड:मय मंडळाच्या उद्घाटन समारंभात त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. त्यांच्यासमवेत कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, पर्यावरणतज्ज्ञ राजेंद्र केरकर, निसर्गकन्या समृद्धी केरकर, वाङमय मंडळाचे प्रमुख प्रा. दिलीप बर्वे आदी उपस्थित होते. यावेळी पौर्णिमा केरकर यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

प्रा. राजेंद्र केरकर म्हणाले की, माणूस घडविणारे शिक्षण आज हवे आहे. भावनिकता हरवत चालली आहे. जगणं सुंदर करण्यासाठी भाषा महत्त्वाची भूमिका पार पडते.

### निसर्ग हाच माझा गुरू –समृद्धी

समृद्धी केरकर म्हणाली, निसर्ग हाच माझा गुरू आहे. त्याच्याच सान्निध्यात राहून मी शिकले. आई–बाबांनी मला मुक्त जीवन जगण्याचे स्वातंत्र्य दिले. शिक्षणातून पदवी व पदवीतून नोकरी या चौकटीतून बाहेर पडून मी अनेक छंद जोपासले. एक खेळ समजून मी शिकले. त्यामुळे आनंद उपभोगता आला. पदवीशिवायही अनेकांनी कला क्षेत्रात करिअर केले आहे. त्यामुळे मलाही पदवीची गरज नसून एक लेखिका म्हणून करिअर करणार असल्याचे तिने सांगितले. साहित्य माणसाला एक आदर्श माणूस बनविते. मात्र, त्यासाठी चिकाटी आणि विश्वास हवा, असेही ती म्हणाली.

**लेखिका म्हणून करिअर करणार– समृद्धी केरकर**

प्रा. पाटील यांनी विद्यार्थ्यांनीही समृद्धीच्या व्यक्तिमत्त्वातून प्रेरणा घेऊन वाटचाल करावी, असे आवाहन केले. प्रास्ताविक मराठी भाषा वाङमय मंडळाचे अध्यक्ष प्रा. दिलीप बर्वे, सूत्रसंचालन दीक्षा हिने केले. आभार प्रा. सोपान जाधव यांनी मानले.